सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल

[१९६१]

राजस्थान राज्य आणि इतर

विरुद्ध

ठाकूर प्रतापसिंग

( एस. के. दास, एम. हिदायतुल्ला, के. सी. दास गुप्ता, जे. सी. शाह आणि एन. राजगोपाला अय्यंगार, जे. जे.)

जाती आणि धर्माच्या आधारावर भेदभाव - सरकारी अधिसूचनेनुसार " हरिजन आणि मुस्लिमाना अतिरिक्त पोलिस शुल्काच्या देयकातून सूट दिली आहे. वैधता - भारताचे संविधान अनुच्छेद १५ (१) - पोलीस कायदा, १८६१ ( १८६१ चे ५ वे ), कलम १५.

राजस्थान सरकारने पोलीस कायद्याच्या कलम १५ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनेच्या परिच्छेद ४ द्वारे, काही विशिष्ट खेड्यातील हरिजन आणि मुस्लिम रहिवाशांना तेथे तैनात असलेल्या अतिरिक्त पोलीस दलाचा खर्च भरण्यापासून सूट दिली. हि अधिसूचना भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५ (१) मध्ये असलेल्या हमीचा भंग करणारी असल्यामुळे तिला आव्हान देण्यात आले होते.

(न्यायालयाने) असे मानले आहे कि परिच्छेद ४ कायद्याचे पालन करणाऱ्या इतर जातीच्या सदस्यांबाबतीत भेदभाव करीत आहे व जाती आणि धर्माच्या आधारावर मुस्लिम आणि हरिजन यांच्या बाजूने होत असल्यामुळे, संविधानाच्या अनुच्छेद १५ (१) च्या तरतुदीद्वारे याला थेट फटका बसला आहे व म्हणून ते अवैध असे घोषित केलेच पाहिजे.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक २३१ / १९५६.

रिट याचिका क्रमांक १४१/१९५२ मध्ये राजस्थान उच्च न्यायालयाच्या जयपूर येथील (जयपूर खंडपीठाद्वारे ) दिनांक ११ सप्टेंबर १९५३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध अपील

अपीलकर्त्यांसाठी एम. एस. के. शास्त्री आणि टी. एम. सेन.

प्रतिवादी हजर झाला नाही.

१८ ऑगस्ट , १९६० रोजी न्यायमूर्ती मा. राजगोपाला अय्यंगार यांनी न्यायालयाचा निर्णय दिला.

राजगोपाला अय्यंगार, जे.- हे अपील राजस्थान राज्याने पोलिस कायदा, १८६१ (१८६१ चा ५) च्या कलम १५ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनेच्या एका परिच्छेदाच्या घटनात्मक वैधतेवर विचार करण्यासाठी आव्हान करते, ज्यानुसार, ज्या गावांमध्ये अतिरिक्त पोलिस दल तैनात होते त्या गावांतील 'हरिजन' आणि 'मुस्लिम' रहिवाशांना त्या दलाचा कोणताही खर्च देण्याच्या दायित्वातून सूट देण्यात आली होती.

असे म्हटले आहे की राजस्थान राज्यातील झुनझुनू जिल्ह्यातील काही गावांतील रहिवाशांनी दरोडेखोरांना आणि चोरीचा माल घेणाऱ्यांना थारा दिला, शिवाय ते घरमालक आणि भाडेकरू यांच्यामध्ये समस्या निर्माण करत होते. त्यामुळे त्या परिसरात गंभीर दंगली झाल्या, परिणामस्वरूप त्यात काही लोकांनी आपला जीव गमावला. त्यामुळे पोलीस कायद्याच्या कलम १५ अंतर्गत राज्य सरकारने कारवाई केली. या कलमात असे म्हटले आहेः

"अशांत किंवा धोकादायक जिल्ह्यांमध्ये अतिरिक्त पोलिसांची तैनात".

(१) राज्य सरकारला अधिकृत राजपत्रामध्ये जाहीरनाम्याद्वारे अधिसूचित करणे व राज्य सरकार निर्देश देईल अशा इतर पद्धतीने, असे घोषित करणे वैध ठरेल कि त्यांच्या अधिकारातील कोणतेही क्षेत्र अशांत किंवा धोकादायक स्थितीत आहे किंवा अशा भागातील रहिवाशांच्या किंवा त्यांच्यापैकी कुठल्याही वर्गाच्या किंवा प्रकारच्या लोकांच्या वर्तनामुळे पोलिसांची संख्या वाढवणे फायदेशीर ठरेल.

(२) त्यामुळे पोलीस महासंचालक किंवा राज्य सरकारच्या वतीने या बाबतीत अधिकार प्रदान केलेल्या इतर अधिकाऱ्यासाठी, राज्य सरकारच्या मंजुरीने अशा जाहीरनाम्यात निर्देशित केलेल्या भागांमध्ये नियुक्त केल्या जाणाऱ्या स्थायी तैनाती व्यतिरिक्त कोणतेही इतर पोलीस दल तैनात करणे हे वैध ठरेल.

(३) या कलमाच्या उपकलम (५) च्या तरतुदी नुसार , अशा अतिरिक्त पोलिस दलाचा खर्च जाहीरनाम्यात वर्णन केलेल्या भागातील रहिवासी उचलतील.

(४) जिल्हा दंडाधिकारी, त्याला आवश्यक वाटेल अशा चौकशीनंतर, या खर्चाचे अशा रहिवाशांमध्ये वाटप करेल जे असा खर्च करण्यास, वर सांगितल्याप्रमाणे जबाबदार आहेत आणि ज्यांना पुढील

उपकलमांतर्गत सूट देण्यात येणार नाही. सदर वाटप अशा रहिवाशांच्या भागातील संबंधित साधनांनुसार दिलेल्या दंडाधिकाऱ्यांच्या न्यायनिर्णयानुसार केले जाईल.

(५) अशा रहिवाशांमधील कोणत्याही व्यक्तीला किंवा वर्गाला किंवा विभागाला अशा खर्चाच्या दायित्वातून आदेशाद्वारे सूट देणे राज्य सरकारसाठी कायदेशीर ठरेल.

उपकलम (६) संबंधित नसल्यामुळे वगळण्यात आला आहे.

ज्या अधिसूचनेद्वारे या तरतुदी लागू करण्यात आल्या होत्या आणि जी या कार्यवाहीमध्ये आक्षेपार्ह आहे, ती अधिसूचना या अटींमध्ये होती.

"ज्याअर्थी राजप्रमुखांचे समाधान झाले आहे कि येथे संलग्न केलेल्या अनुसूचीमध्ये दर्शविलेले क्षेत्र अशांत आणि धोकादायक स्थितीत असल्याचे आढळले .

त्यामुळे पोलीस कायद्याच्या (१८६१ चा ५) कलम १५ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून राजप्रमुख हे जाहीर करत आहे की, या अनुसूचीत समाविष्ट असलेली २४ गावे या अधिसूचनेच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अशांत क्षेत्र मानली जातील.

पोलीस कायद्याच्या (१८६१ चे ५ वे ) कलम १५ च्या उपकलम २ अन्वये, राजप्रमुखांनी पोलीस महानिरीक्षकांना सदर भागात , त्या भागातील सामान्य कायमस्वरूपी दलाव्यतिरिक्त इतर कोणतेही पोलीस दल सदर भागातील रहिवाश्यांच्या खर्चाने नियुक्त करण्यासाठी अधिकृत केले आहे.

उक्त कायद्याच्या कलम १५ च्या उपकलम ५ अन्वये, राजप्रमुख यांनी या गावांतील हरिजन किंवा मुस्लिम रहिवाशांना अतिरिक्त पोलीस दलाच्या नियुक्तीमुळे होणाऱ्या खर्चाच्या दायित्वातून सूट दिली आहे.

त्यानंतर 24 गावांची नावे आली.

प्रतिवादी - ठाकूर प्रतापसिंग हे बारागावचे - या २४ गावांपैकी एक गाव, रहिवासी असल्याने त्यांनी पोलीस कायद्याच्या कलम १५ च्या वैधतेवर विशेषतः त्याच्या उपकलम ५ आणि अधिसूचनेच्या वैधतेवर आक्षेप घेत, याचिका किंवा भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २२६ खाली निर्देशासाठी आणि योग्य दिलास्यासाठी प्रार्थना करत राजस्थान उच्च न्यायालयाकडे धाव घेतली . उच्च न्यायालयाने सर्वसाधारणपणे पोलीस कायद्याच्या कलम १५ च्या अवैधतेबाबत आणि "अशा रहिवाशांच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा वर्गांना किंवा विभागांना" अतिरिक्त पोलीस दलाचा खर्च उचलण्याच्या दायित्वातून सूट देण्याचे आदेश राज्य सरकारला देण्यात आलेल्या अधिकारांबाबत केलेल्या व्यापक युक्तिवादांना फेटाळून लावले. परंतु विद्वान न्यायाधीशांनी असे मत मांडले की अधिसूचनेचा परिच्छेद ४, ज्यामध्ये "गावातील हरिजन आणि मुस्लिम रहिवाशांना" शुल्क आकारणीतून सूट देण्यात आली आहे, ते संविधानाच्या

अनुच्छेद १५ (१) मधील हमीचा भंग करणारे आहे, जे जात किंवा धर्म या आधारे भेदभाव करण्याच्या विरुद्ध आहे. ते पुढीलप्रमाणे --

"राज्य कोणत्याही नागरिकाविरुद्ध केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा त्यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही".

आणि ते असंवैधानिक म्हणून रद्द करेल.

या आदेशामुळे व्यथित झालेल्या राजस्थान राज्याने या न्यायालयात अपील दाखल करण्यास सक्षम असण्यासाठी अनुच्छेद १३२ (१) नुसार प्रमाणपत्रासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आणि तो मंजूर झाल्यानंतर, अपील आता आपल्यासमोर आहे.

आक्षेपार्ह अधिसूचनेनुसार गावातील हरिजन आणि मुस्लिम रहिवाशांना दिलेली सूट ही केवळ 'जाती' किंवा 'धर्म' किंवा कलम १५(१) मध्ये नमूद केलेल्या इतर निकषांवर आधारित नव्हती, परंतु या आधारावर कि या दोन समाजातील व्यक्ती ज्या वर्तनासाठी अतिरिक्त पोलीस दल तयार करने आवश्यक होते त्या वर्तनासाठी राज्याला दोषी नसल्याचे आढळून आले हे दाखवण्यासाठी राज्याच्या विद्वान वकिलांनी अथक प्रयत्न केले. हा तोच युक्तिवाद होता जो उच्च न्यायालयामध्ये केला होता व तो विद्वान न्यायाधीशांनी फेटाळला. त्यांनी असे निरीक्षण नोंदवले कि --

"आता हा एक अतिशय विचित्र युक्तिवाद आहे की केवळ एका विशिष्ट समाजाचे किंवा जातीचे नागरिक कायद्याचे पालन करणारे होते आणि इतर समाजाचे सदस्य (तसे) नव्हते. कोणत्याही समाजाच्या किंवा धर्माच्या सदस्यांमध्ये जितके स्वच्छ घटक असू शकतात तितकेच त्या समाजाच्या किंवा धर्माच्या सदस्यांमध्ये त्रासदायक घटक असू शकतात.

विद्वान न्यायाधीशांनी येथे व्यक्त केलेले मत आमच्या मते योग्य आहे. जरी समाजातील बहुसंख्य सदस्यांना सूट देण्यात आली असली किंवा ते सर्व कायद्याचे पालन करणारे असले, तरी असा युक्तिवाद राज्याच्या वतीने केला गेला नाही कि ज्या २४ गावांमधील इतर समाजातील लोकांवर दंडात्मक कर आकारण्याचे निर्देश देण्यात आले होते, ते शांततापूर्ण आणि कायद्याचे पालन करणारे व्यक्ती नाहीत. उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या याचिकेच्या परिच्छेद ५ (एफ) मध्ये प्रतिवादीने असे म्हटले होते :

"उपरोक्त अधिसूचना भारतीय राज्यघटनेच्या अधिकारक्षेत्राबाहेर आहे, कारण ती गावातील नागरिकांमध्ये धर्म, वंश किंवा जातीच्या आधारावर भेदभाव करते, जशी ती मोहम्मदन धर्म पाळणाऱ्या व्यक्ती आणि इतरांमध्ये फरक करते, आणि मुस्लिम आणि हरिजन असलेल्या व्यक्ती आणि इतरांमध्येही जातीनुसार फरक करते. त्यामुळे हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १५ च्या तरतुदींचे उल्लंघन करते".

राज्याने याचे उत्तर या अटींनुसार दिले होते :

" या गावांमधील हरिजन आणि मुस्लिम रहिवाशांना त्यांच्या धर्म, वंश किंवा जातीमुळे नव्हे तर २४ गावांमध्ये जेथे अतिरिक्त सैन्य तैनात करण्यात आले आहे तेथे ते शांतताप्रिय आणि कायद्याचे पालन करणारे नागरिक असल्याचे आढळून आले आहे म्हणून त्यांना अतिरिक्त दलाच्या खर्चाच्या दायित्वातून सूट देण्यात आली आहे ".

हे दिसून येईल की, जरी उच्च न्यायालयासमोर याचिका आहे कि इतर समाजातील अशा कोणत्याही व्यक्ती नव्हत्या ज्या शांतताप्रिय आणि कायद्याचे पालन करणाऱ्या होत्या आणि ते जरी योग्य असू शकले पण तरी, राज्याच्या दृष्टीने या इतर समाजातील बहुसंख्य लोकांचा कल दुसऱ्या दिशेने होता. असे असल्यास, या अधिसूचनेद्वारे इतर समाजाच्या कायद्याचे पालन करणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत केवळ 'जात' किंवा 'धर्माच्या' आधारावर (मुस्लिम आणि हरिजन समाजातील प्रत्येकजण 'शांतताप्रिय आणि कायद्याचे पालन करणारे' होते असे गृहीत धरून) भेदभाव केला आहे. इतर कारणे असतील तर ती अधिसूचनेत नमूद करायला हवी होती. हे स्पष्ट आहे की ही अधिसूचना कलम १५ (१) च्या अटींच्या थेट विरुद्ध आहे आणि अधिसूचनेच्या परिच्छेद ४ मध्ये विशिष्ट घटनात्मक प्रतिबंधाचे उल्लंघन केल्याबद्दल दूषण दिले गेले आहे. आमच्या मते, उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांचे अधिसूचनेचा हा परिच्छेद रद्द करणे अगदी योग्य होते.

अपील अयशस्वी होत आहे आणि फेटाळले जात आहे. प्रतिवादी हजर नाही त्यामुळे खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील फेटाळण्यात आले.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x